सत्यमेव जयते
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION
मुख्य कार्यालय
बँक ऑफ इंडिया इमारत, ३रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४०० ००१. फोन : ०२२ २२६७ ०२१० / १४८ / २४८ / ३३७ फॅक्स : ०२२ २२६७३९१५
Bank of India Bldg., 3rd Floor, M. G. Road, Hutatma Chowk, Mumbai – 400 001. Tel.: 022-2267 0210 / 148 / 248 / 337 Fax : 022-22673915
माझगांव कार्यालय
विक्रीकर भवन, ९ वा मजला, रुम नंबर ९१५,सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ ०२२-२३७४२१९१ फॅक्स : ०२२-२३७८१०६१
Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balwantsing Dodhi Marg, Mazgaon,Mumbai-400203 022 - 23742191 FAX : 022-23781061
ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट - www.mpsc.gov.in

**राज्य सेवा (पूर्व) परीक्षा -२०१०**

**क्रमांक १४७७(१)/२०१०/तीन**

निम्नलिखित पदांकरिता राज्य सेवा (पूर्व) परीक्षा -२०१० ही **रविवार, दिनांक ०९ मे, २०१०** रोजी घेण्यात येईल. प्रस्तुत परीक्षा महाराष्ट्रातील विविध ३५ जिल्हाकेंद्रावर घेण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मातरित | अ.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,गट-ब (एकूण १८पदे) | ९ | २ | २ | -- | २ | -- | १ | -- | २ |
| | महिला - | ३ | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | १ |
| २ | नायब तहसिलदार, गट- ब (एकूण ९२ पदे) | ४६ | ११ | ८ | ३ | ४ | १ | ७ | १ | ११ |
| | महिला - | १४ | ४ | २ | १ | १ | -- | २ | -- | ४ |
| | खेळाडू - | २ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |

२.१ **उपजिल्हाधिकारी- गट अ, तहसिलदार- गट अ, पोलीस उपअधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, गट-अ, व उपनिबंधक, सहकारी संस्था, गट- अ** या संवर्गाकरिता शासनाकडून पदे उपलब्ध होण्याची शक्यता आहे. सदर पदे उपलब्ध झाल्यास मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेत त्याबाबतचा तपशील देण्यात येईल.

**२.२ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.**

**२.३ महिलांसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.**

२.४ बाब क्रमांक २.१ मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी पोलीस उपअधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, गट-अ वगळता अन्य संवर्गात शासनाकडून अपंगासाठी पदे उपलब्ध होण्याची शक्यता आहे. तशी पदे उपलब्ध झाल्यास ती पदे त्या संवर्गातील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.५ अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. **तथापि त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे आवश्यक आहे.**

**३. वेतनश्रेणी :-**

३.१ गट-ब या पदांकरिता रूपये ९,३००-३४,८०० ,,(ग्रेड पे) ४,४०० अधिक भत्ते.

**४. पात्रतेच्या अटी :-**

**४.१ वयोमर्यादा :-**

४.१.१ उमेदवाराचे वय दिनांक १ एप्रिल, २०१० रोजी किमान १९ वर्षे असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.१.२ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

**(एक)** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

**(दोन)** अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षांपर्यंत.

**(तीन)** पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

**(चार)** माजी सैनिक/ आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.

**(पाच)** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४.२ शैक्षणिक अर्हता :-**

४.२.१ मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

४.२.२ पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार सुध्दा या पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०१० करिता अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांनी राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०१० चा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच ज्या पदासाठी अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल त्या पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास पूर्ण केली असली पाहिजे.

४.२.३ सर्व पदांसाठी मराठीचे ज्ञान आवश्यक राहील.

४.२.४ पोलीस उपअधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, गट- अ यासारख्या पदांसाठी विशिष्ट शारिरीक क्षमता आवश्यक असून ती माहितीपुस्तिकेतील भाग-२ मधील बाब क्रमांक २.१.४.२ मध्ये दर्शविण्यात आली आहे

**४.३ अपंग उमेदवारांसाठी पात्रता :-** अपंग आरक्षण शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**५. अर्ज व माहितीपुस्तिका मिळण्याचे ठिकाण :-**

५.१ स्पर्धा परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेल्या नमुन्यातच अर्ज करणे आवश्यक आहे.

५.२ अर्जासह माहितीपुस्तिका (फिक्कट निळया रंगाची) महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा प्रधान डाकघर व तालुका मुख्यालयाच्या पोस्ट कार्यालयांमध्ये पोस्टाच्या कार्यालयीन वेळेत विक्रीसाठी उपलब्ध आहे.

५.३ मुंबई तसेच नवी मुंबईच्याबाबतीत अर्जासह माहितीपुस्तिका पुढील ठिकाणी कार्यालयीन वेळेत विक्रीसाठी उपलब्ध आहे:-

| मुंबई | |
|---|---|
| **काळबादेवी प्रधान डाकघर,** रेशम बाजार लेन, मुंबई- २. | **दादर प्रधान डाकघर,** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, मुंबई- १४. |
| **चिंचबंदर प्रधान डाकघर,** शायदा मार्ग, मस्जीद रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई ३ ९. | **अंधेरी प्रधान डाकघर,** डी.एन.नगर, अंधेरी, मुंबई- ५३. |
| **चेंबूर प्रधान डाकघर,** टेन्थ रोड, मुंबई- ७१. | **बोरिवली प्रधान डाकघर,** एम.एच.बी.कॉलनी, मुंबई- ९१. |
| **माहिम प्रधान डाकघर,** टी.एच.कटारिया मार्ग,मुंबई- १६. | **मुंबई सेंट्रल प्रधान डाकघर,** डॉ. बेलासिस रोड, मुंबई- ८. |
| **माझगाव डिलिव्हरी पोस्ट ऑफिस,** तळमजला, पोरबंदरवाला अपार्टमेंट, माझगांव, मुंबई- १०. | **स्टॉक एक्स्चेंज पोस्ट ऑफिस,** फोर्ट मेन्शन, हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- १. |
| | मुंबई जी.पी.ओ. मुंबई- १ |
| नवी मुंबई | |
| **वाशी पोस्ट ऑफीस,** प्लॉट नंबर १८ व १९, सेक्टर-१६ अ, वाशी-४००७०३. | |
| **कोकण भवन पोस्ट ऑफीस,** विभागीय आयुक्त कार्यालय, सिडको भवन समोर, सीबीडी बेलापूर- ४००६१४. | |

**५.४** अर्जासह माहितीपुस्तिका उपलब्ध असलेल्या पोस्ट कार्यालयांची यादी आयोगाच्या वेबसाईटवर (www.mpsc.gov.in) उपलब्ध आहे.

**५.५** अर्जासह माहितीपुस्तिकेची किंमत रुपये १००/- इतकी आहे.

**५.६** प्रस्तुत परीक्षेस अर्ज करण्यासाठी "स्पर्धा परीक्षेकरिता अर्ज व माहितीपुस्तिका" असे नमूद केलेली (फिक्कट निळया रंगाची) माहितीपुस्तिकाच विकत घ्यावी असे उमेदवारांना सूचित करण्यात येत आहे.

**५.७** अर्ज एकदाच व फक्त एकाच परीक्षेसाठी वापरता येईल.

**५.८** अर्जासह माहितीपुस्तिकेच्या विक्रीची व्यवस्था फक्त निवडक पोस्ट कार्यालयांतच करण्यात आली आहे. आयोगाच्या कार्यालयात अर्जाच्या विक्रीची कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. तसेच, अर्ज मागविण्याकरिता पत्राद्वारे विनंती केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

**५.९** अर्जासह माहितीपुस्तिकेच्या उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवारांनी संबंधित पोस्ट मास्टर अथवा आयोगाच्या कार्यालयांशी वर नमूद केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

**६. शुल्क :-**

**६.१** अमागास - **रुपये २५०/-**

**६.२** मागासवर्गीय - **रूपये १२५/-**

**६.३** परीक्षा शुल्क आवेदनपत्रासोबत रोखीने भरणे आवश्यक आहे.

**७. अर्ज सादर करण्याचे ठिकाण व अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक :-**

**७.१** संपूर्ण भरलेला अर्ज **(अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या प्रती किंवा कोणतीही मुळ प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे किंवा त्यांच्या प्रती जोडू नयेत.)** परीक्षा शुल्कासह माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केलेल्या राज्यातील सर्व जिल्हा, प्रधान डाकघर व तालुका मुख्यालयाच्या पोस्ट कार्यालयांपैकी कोणत्याही ठिकाणी कार्यालयीन वेळेत **दिनांक ११ जानेवारी, २०१० ते ९ फेब्रुवारी, २०१०** पर्यंत स्वीकारण्यात येईल.

**७.२** संपूर्ण भरलेला अर्ज व परीक्षा शुल्क फक्त पोस्ट कार्यालयामार्फतच विहित कालावधित स्वीकारण्यात येईल. आयोगाच्या कार्यालयात कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारला जाणार नाही. अथवा त्यासंदर्भातील चौकशीची दखल घेतली जाणार नाही.

**८.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. आवश्यक अर्हता, पदांबाबतची इतर माहिती, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, आरक्षण, निवडीचे सर्वसाधारण स्वरुप, प्रमाणपत्रांचे नमूने, परीक्षा केंद्र इत्यादी माहितीकरिता अर्जासोबत पुरविण्यात येणा-या माहितीपुस्तिकेचे कृपया अवलोकन करावे.

**९.** प्रस्तुत परीक्षेची पूर्व परीक्षा ही जुन्या अभ्यासक्रमानुसार व मुख्य परीक्षा नवीन अभ्यासक्रमानुसार घेण्यात येणार असून पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम माहितीपुस्तिकेतील भाग-२ मधील बाब क्रमांक २.१.५ मध्ये समाविष्ट केलेला आहे व मुख्य परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**दी. प्र.मिरजकर**
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

मुंबई :
दिनांक : ३१ डिसेबर, २००९